Impact Factor 3.025

ISSN 2349-638x

Refereed And Indexed Journal

AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

Monthly Publish Journal

VOL-IV ISSUE-III MAR. 2017

Address
· Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
· Tq. Latur, Dis. Latur 413512 (MS.)
· (+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
· aiirjpramod@gmail.com
· aayushijournal@gmail.com

Website
· www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

छत्रपती शिवाजी महाराज यांची राजनिती : विशेष संदर्भ आज्ञापत्र

डॉ. बालाजी विठ्ठलराव डिगोळे
मराठी विभाग प्रमुख,
शिवजागृती महाविद्यालय, नळेगाव

'आज्ञापत्र' रामचंद्र नीळकंठ अमात्य यांनी लिहिलेली ही मराठीतील एक बखर आहे. मराठीमध्ये बखर वाङ्मय हे महत्वाचे मानले जाते. कारण सर्व बखरी या गद्यामध्ये लिहिल्या गेलेल्या आहेत आणि मराठीत गद्यवाङ्मय हे मुळातच फार कमी आहे. त्यामुळे बखरींना मराठी वाङ्मयाच्या इतिहासात महत्व आहे. 'बखर' हा शब्द हकिकत, बातमी, इतिहास, कथानक, चरित्र या अर्थाने वापरला जातो. हा शब्द 'खबर' या फार्सी शब्दापासून वर्णविपर्यायाने आला असावा असे एक मत आहे. कारण या काळात बखरी लिहिल्या गेल्या त्याकाळात मराठी भाषेवर फार्सी भाषेचे वर्चस्व होते म्हणून 'खबर' पासून बखर ही व्युत्पत्ती बरोबर असावी असे वाटते. राजवाडे यांच्या मते बखर या शब्दाची व्युत्पत्ती 'खबर' या फार्सी शब्दापासून करणे योग्य नाही, तर ते या शब्दाची व्युत्पत्ती संस्कृतपासून सांगतात. 'भख' पासून बख आणि त्यापासून बखर अशी व्युत्पत्ती राजवाडे देतात. बखर म्हणजे 'कहाणी' या अर्थाने हा शब्द आला. याप्रकारे खबर या फार्सी शब्दापासून आणि भख या संस्कृत शब्दापासून बखरची व्युत्पत्ती सांगीतली गेली आहे.

बखरीमध्ये प्रामुख्याने इतिहास लिहून ठेवलेला असतो. आज भारतीयांमध्ये इतिहास लिहून ठेवण्याची पध्दतच नव्हती; पण मुसलमानांच्या सहवासानंतर त्यांच्या तवारीखा पाहून मराठयांनीही बखरी लिहिण्याचा प्रकार निवडला असे राजवाडे म्हणतात ते बरोबर वाटते. आज 'बखर' या शब्दाचा अर्थ जो रूढ आहे तो राजकीय हकिकत असा आहे किंवा राजा अथवा वीरपूरुष यांचे चरित्र किंवा त्यांनी केलेल्या लढायांचे वर्णन असा आहे. म्हणजेच बखर शब्दांच्या अर्थात इतिहास या कल्पनेलाच प्राधान्य आहे. आपल्या देशाचा प्राचीन इतिहास पुराणामध्ये लुप्त झाला आहे. किंबहुना प्राचीन काळी पुराण व इतिहास हे शब्द जवळ जवळ एकाच अर्थाने वापरले जात असलेले दिसतात. मोगल बादशहाची आत्मचरित्रे आणि चरित्रे पाहून या प्रकारच्या इतिहास लेखनाच्या संपर्कानेच आपल्याकडे बखर रूपाने इतिहास लेखन सुरू झाले. मुसलमान राजवटीतील तवारीखा नामे अखबार हे सर्व इतिहासाचेच प्रकार होत हे पाहूनच आपल्याकडे बखर लेखनाला म्हणजेच इतिहास लेखनाला सुरूवात झाली असावी. बहुतेक बखरकार हे कोणत्यातरी राजाचे किंवा सरदाराचे आश्रीत असल्याने व बहुतेक बखरकारांचे हे संस्कृत वाङ्मयाचे वाचन झालेले असल्याने पुराणांच्या संपर्कात आलेले होते. या पुराणांना वाचून त्यांनी बखरी लिहिल्या. त्यातही बहुतेक बखरी या कोणाच्या ना कोणाच्या आज्ञेवरून लिहिल्या गेलल्या आहेत. म्हणून बहुतेक बखर वाङ्मय हे आत्मस्फूर्तीने लिहिले गेले नसून ते कोणाच्या तरी आज्ञेने लिहिले गेलेले असल्याने परस्फूर्तीने लिहिले गेलेले आहे. बहुतेक बखकार हे कोणातरी राजाचे, सरदाराचे आश्रीत होते. संस्कृतचे व्यासंगी होते. त्यामुळे त्या राजाला किंवा सरदाराला त्याच्या घराण्याचा पूर्वजाचा किंवा त्याच्या घराण्यात घडलेल्या एखाद्या रोमहर्षक ऐतिहासिक प्रसंगाचा लेखस्वरूपात अहवाला किंवा माहिती लिहून पाहिजे असायची. अशाच स्वरूपाच्या आज्ञा बहुतेक बखरींच्या सुरूवातीला आल्या आहेत. या आज्ञा होताच स्वामीनिष्ठ बखरकार आपल्या धन्याची आज्ञा प्रमाण मानून आज्ञेप्रमाणे राजपुरूषाचे चरित्र, घराण्याचा इतिहास किंवा त्या राजघराण्यात घडलेल्या रोमहर्षक प्रसंगाचे वर्णन करून देत असे आणि आपल्या मालकाला संतुष्ट करीत असे. त्यामुळे अर्थातच बखरींना ऐतिहासिक मूल्य लाभू शकत नाही कारण इतिहासाची जरी सत्यदर्शनाची प्रतिज्ञा असते तशी बखरीची असू शकत नाही. कारण स्वामी निष्ठेतून बखरी लिहिल्या गेल्यामुळे इतिहासकारांच्या ठिकाणी असणारी तटस्थता बखरकारांच्या ठिकाणी नाही, तर तटस्थतेऐवजी मालकाची बाजू घेऊन लिहिण्याचा प्रयत्न येथे आढळून येतो. म्हणून ही तटस्थतेच्या अभावी बखरींना इतिहास म्हणून मूल्य देता येत नाही.

पुराणाचे आदर्श समोर ठेऊन लेखन केल्यामुळेही इतिहास म्हणून बखरींच्या विश्वासार्हतेला तडा गेला आहे. पुराणाचा प्रश्न,विश्वाची उत्पत्ती, मोठमोठाले वंश यांच्या निवेदनात होतो व शेवट ग्रंथपठणाच्या फलश्रुतीने होतो.बखर लिहिताना

बऱ्याचशा बखरकारांनी हाच मार्ग अवलंबीला आहे. शिवकालीन बखरीत हा विशेष प्रामुख्याने आढळून येतो. सभासदाची बखर ही मराठीतील एक प्रमुख बखर मानली जाते. तिच्या पुराण लेखनाचे सर्व विशेष आढळून येतात. अतिशयोक्ती व अद्‌भूतता कल्पनारम्य वर्णने करून प्रसंग नायकाचे श्रेष्ठत्व हे पुराणाप्रमाणेच बखरकार सिध्द करण्याच्या प्रयत्नात असतात म्हणूनच शिवाजीला हे बखरकार श्रेष्ठ मानवाच्या रूपात न पाहता शिवाच्या अवतारातच पाहतात. याप्रकारे नायकाला पुराणातील नायकाप्रमाणे अतिमानुस शक्तीच्या रूपात हे बखरकार पाहतात यामध्ये इतिहास लेखनात जी सत्यनिष्ठा यायला हवी ती येत नाही, तर अद्‌भूतरम्यतेने बखर भरली जाते असे होण्याचे कारण म्हणजे रामायण, महाभारतासारख्या पुराणाचे आदर्श या बखरकारांसमोर आहे. आपले लेखन आकर्षित करण्यासाठी अतिशयोक्ती व अद्‌भूतता या शिवाय बखराकार काव्यमय शैलीचा उपयोग करण्याचा प्रयत्न करतो उपमा, अलंकार, सुभाषिते, म्हणी, प्रसंगाचे हुबेहुब वर्णन अशा साहित्य गुणांनी आपली बखर सजवण्याचा बखरकाराचा प्रयत्न असतो. यामुळे सुध्दा इतिहासाचे मूल्य बखरीला येऊ शकत नाही. समकालीनांनी लिहिलेल्या बखरी व उत्तरकालीनांनी लिहिलेल्या बखरी असे दोन भेद बखरीच आहेत. समकालीनांनी जे बखरी लिहिल्या आहेत त्या त्यातल्या त्या इतिहासाच्या दृष्टीने अधिक विश्वासग्रह आहेत; पण उत्तरकालीन ज्या बखरी आहेत त्या केवळ श्रुतीवर हवाला ठेऊन काही माहितीचा आधार घेऊन लिहिल्या गेल्यामुळे इतिहासाच्या दृष्टीने बखरी फार थोडया आहेत बहुसंख्य बखरी या पेशवाईच्या शेवटच्या काळात किंवा इंग्रजी राजाच्या प्रारंभकाळात लिहिल्या गेलेल्या आहेत. ज्याप्रकारे सजवलेल्या रूपातला इतिहास, पुराणाचे आदर्श डोळयासमोर ठेऊन लिहिल्यामुळे तयार झालेला अद्‌भूतरम्य इतिहास म्हणजे बखरी असा अर्थ बखरींना प्राप्त झाला आहे. म्हणूनच राजवाडयासारखा इतिहास तज्ञ असे म्हणतो की, एखाद्या अस्सल ऐतिहासिक चिटोऱ्यापुढे सर्व बखरीची किंमत शून्य आहे हे आपल्याला सहज पटते.

बखरींना ऐतिहासिक मूल्य नाही पण साहित्य मूल्य तरी आहे का? हा ही प्रश्नच आहे. हा लेखन प्रकार विशिष्ट सांस्कृतिक परिस्थिती निर्माण झाली आहे.मुळ बखर लेखनाची परंपरा इतिहास लेखनाची असल्याने हा जाणीवपूर्वक लिहिला गेलेला हा साहित्यप्रकारच नाही यामुळेच असे म्हटले जाते त्यामुळे बखरकार हा जाणीवेचा कलांवत नसून नेनिवेतला कलावंत आहे असे म्हटले जाते. यांना स्वतःला जाणीवपूर्वक वाङ्‌मय निर्मिती करायचीच नाही, तर मालकाच्या आज्ञेप्रमाणे लेखन करायचे आहे. मालकाला आवडेल, पटेल, रूचेल असे लेखन करताना वर्णन करण्याची शक्ती आहे. तिची चमक क्वचित मधूनच दिसून येते आणि त्यामुळे कांही बखरीमधील कांही प्रसंगात रसोत्कटता, कल्पनाविलास, रम्य भाषाशैली, उत्कृष्ट वर्णन पध्दती, आकर्षण निवेदन पध्दती आढळून येते; पण या गोष्टी एकूणच कमी आहेत. साहित्यगुणांनी उत्कृष्ट अशी 'होळकरांची कैफीयत' अशी अपवादात्मकच बखर आढळून येते आणि म्हणूनच साहित्याच्या दृष्टीने बखरींना फार मूल्य नाही. म्हणजे इतिहास म्हणून, साहित्य म्हणून दोन्हीही दृष्टीने बखरींना हवे तसे मूल्य नाही, तर हा बखर वाङ्‌मयप्रकार मराठी वाङ्‌मयाच्या इतिहासात वैशिष्टयेपूर्ण व महत्वाचाच मानला जातो. कारण प्राचीन मराठी वाङ्‌मयात आढळणारे दुर्मिळ स्वरूपाचे गद्य यात आढळून येते. म्हणून बखरींना महत्व आहे. महानुभाव गद्यवाङ्‌मयानंतर मधली कांही शतके गद्य वाङ्‌मयाच मराठीत लिहिले गेले नाही. एकदोन आपल्याला बखरीच्या रूपाने आढळून येते.

'आज्ञापत्र' अशा प्रकाराने लिहिला गेलेला ग्रंथ आहे. ज्यात बखरीचे कांही विशेष आढळतात. उदा. इतर बखरीप्रमाणेच ही बखरसुध्दा राजारामाचा राजसबाईपासून झालेला जो मुलगा संभाजी उर्फ शंभुराजे त्याच्या आज्ञेवरून ही बखर लिहिली गेली आहे. असा स्पष्ट उल्लेख बखरीच्या सुरूवातीला आढळून येतो. म्हणून कोणत्या तरी आज्ञेने बखर लिहिली जाते हे वैशिष्टय येथे आढळून येते. मात्र पुराणाच्या आदर्शाप्रमाणे या बखरीची निर्मिती झाली नाही शेवटी फलश्रूतीही येत नाही याचे कारण असे असावे की, इतर बखरीपेक्षा सर्वस्वी वेगळया अशा विषयावर लिहिली गेली आहे. इथे धीरोदात्त चरित्र नायकही नाही. त्याच्या लिला नाहीत आणि एखादा रोमहर्षक प्रसंगावरही ती बखर लिहिली गेलेली नाही. म्हणून असे कदाचित पण पुराणांचे आदर्श येथे आढळून येत नाहीत. राजनीतीचे दर्शन घडविणे हा या ग्रंथाचा हेतू आहे. किंवा राजकारणशास्त्रावरचा हा ग्रंथ असल्याने यात घटनाप्रसंग, व्यक्ती यांना स्थानच नाही. त्यामुळे कल्पना विलासाला वावच राहिला नाही. शास्त्रीय विवेचन महत्वाचे असल्याने व त्याला पुराण ग्रंथाच्या शैलीचा उपयोग नसल्याने कदाचीत शैलीचा लेखकाला त्याग करावा लागला असावा. विषयच राजकारण शास्त्राचा असल्याने साहित्य गुणांनाही फारसा वाव या लेखनात नाही. अशा प्रकारे हे शास्त्रीय स्वरूपाचे लेखन आहे, आणि ही राजनीती बखरकारांनी यथाशास्त्र लिहिले आहे. तरी कोणत्याही विशिष्ट संस्कृत ग्रंथाचा प्रभावही या लेखनावर नाही.

रामचंद्रपंत अमात्य यांचे हे 'आज्ञापत्र' किंवा मराठेशाहीतील ही राजनीती श्रीराजेशंभुछत्रपती यांच्या सांगण्यावरून सन 1715-16 च्या सुमारास लिहिली गेली असावी असे असले तरी मराठी वाचकांना मात्र 1872 ते 74 च्या दरम्यान प्रथम ती अभ्यासासाठी उपलब्ध झाली. पुनः एकदा 1890 ते 91 मध्ये विविध ज्ञानविस्तारातच ती प्रकाशित झाली. 1923 मध्ये ती पहिल्यांदा पुस्तकरूपात प्रकाशित झाली आणि नंतर मग ती पुस्तक रूपाने प्रसिध्द झाली या प्रकारे सुमारे 275 वर्षापूर्वी ती प्रथम जन्माला आली व 100 वर्षापूर्वी ती मराठी वाचकापूढे प्रथम आली. या आज्ञापत्राच्या बाबत कांही वाद आहेत. एक म्हणजे तिचे सर्व सातही प्रकरणे एकाच लेखकाने एकाच वेळी एकाच प्रसंगी लिहिली गेली आहेत का ? यातील कांही प्रकरणे अजून अज्ञात आहेत काय ? असलेल्या सात प्रकरणापैकी पहिली दोन प्रकरणे अमात्याशिवाय दुसऱ्या कोणी लेखकाने लिहिले आहेत काय ? आणखी एक वाद असा या राजनीती ग्रंथांचा लेखक नक्की कोण ? रामचंद्रपंत अमात्य बावडेकर का ? रामचंद्र निळकंठ अमात्य असा हा वाद आहे. कांही विद्वानांच्या मते शेवटची पाच प्रकरणे खुद्द शिवाजी राजानेच सांगीतल्याने याचे कर्तृत्व शिवाजीराजाडेच जाते. याप्रकारे ग्रंथकर्तृत्वाबात तीव्र मतभेद आहेत आणखी मतभेदाचा मुद्दा असा की, ज्यांनी कोणी हा ग्रंथ लिहिला त्यानेच त्याची सातही प्रकरणे लिहिली आहेत काय? पहिली दोन प्रकरणे कोणी वेगळया माणसाने लिहिली व उरलेली पाच प्रकरणे कोण्या वेगळया माणसाने लिहिली. कारण विषयात लेखन शैली, लेखन पध्दती व इतका फरक आढळून येतो. त्यामुळे अशी शंका येते. याप्रकारे आज्ञापत्राबाबत कर्त्यापासून स्वरूपापर्यंत अनेक प्रकारचे वाद आहेत. त्यात पहिली दोन प्रकरणे इतकी संदिग्ध आहेत की, त्यातील लेखनाचा नेमका अर्थच आपल्याला कळू शकत नाही. ती कोणाला उद्देशून लिहिलेली आहे त्यातील विषयांचा रोख नक्की कोणाकडे आहे. हे समजणे अवघड आहे. म्हणून ती प्रकरणे व्यवस्थित समजू शकत नाहीत राजनीती शास्त्राचा जो विषया पुढील पाच प्रकरणातून हाताळला गेला आहे. किंवा मांडला गेला आहे. त्याचा पदस्पर्शही पहिल्या दोन प्रकरणांना नाही म्हणून या राजनीती पहिली दोन्ही प्रकरणे एकदम वेगळी उमटून पडतात.

प्रस्तुत आज्ञापत्राचा विषय हा शिवाजीच्या राजनीती विषयीचे दिग्दर्शन करणे हा असल्याने पहिली दोन प्रकरणे आपण वाचली नाहीत, तर काही फरक पडत नाही. कारण या राजनीती शास्त्राचा किंवा शिवाजीच्या राजनीतीचा पुसटसा स्पर्शही या दोन प्रकरणांना झाला नाही. म्हणून या बखरीची शेवटची पाच प्रकरणे अभ्यासाच्या दृष्टीने महत्वाची आहेत. सर्व वादांचा विचार करून आपण निष्कर्ष असा काढू शकतो. या बखरीचा कर्ता रामचंद्रपंत अमात्यच असावा. मराठीतला राजनीतीशास्त्रावरचा हा उपलब्ध असलेला पहिलाच ग्रंथ आहे. पण राजनीतीच्या वा राजकारणाच्या सर्वच अंगाचा येथे ऊहापोह केलेला आहे. असे नाही. राजा, सैन्य, किल्ले, आरमार, राजाने करायची सेवकभरती, राजाने करावयाची कर्तव्ये, प्रधानाचे महत्व अशा बरोबरच राज्यातील व्यापाराचे महत्व येथे विषद केले आहे. मात्र युध्द, कोष इत्यादी महत्वाच्या राज्यांगावर येथे विस्तारपूर्वक विवेचन नाही. प्रस्तुतची राजनीती अमात्यांनी यथाशास्त्र जरी लिहिलेलली असली तरी तिच्यावर कोणत्याही एका संस्कृत ग्रंथाचा प्रभाव नाही. याप्रकारे शिवाजी राज्याच्या अष्टप्रधान मंडळातील अमात्य रामचंद्रपंत अमात्य यांनी शिवाजीचे कर्तृत्व राज्यकारभार, राजकारण पध्दती वागण्यातील बारकावे अतिशय जवळून बघितलेले असल्यामुळे शिवाजीच्या राजकारण पध्दतीवर येथे मोठा प्रकाश पडतो. शिवाजी राजाच्या शिकवणुकीची संपूर्ण छाया आज्ञापत्राच्या विवेचनावर पडलेली दिसते आणि म्हणूनच आज्ञापत्रात आहे ते अस्सल आहे, ताजे व टवटवीत, जीवंत आहे. शिवाजी राजाची राजवट व शिवाजीराजांना जवळून पाहिल्याने आज्ञापत्राच्या प्रत्येक ओळीत अनुभवाचे पाणी चढलेले दिसून येते.

पहिल्या दोन प्रकरणात शिवाजी राजांनी स्वराज्य कसे निर्माण केले. संभाजी व राजाराम यांनी पुढे कसे ते टिकवले व सावरले अखंड युध्द प्रसंगामुळे प्रजेची दुरावस्था कशी झाली आहे. इत्यादी दुरावस्था झाली आहे; पण आज्ञापत्रातील खऱ्या राजनीतीस शिवकालीन राजकारण शास्त्रावरील प्रारंभ खरे तर तिसऱ्या प्रकरणापासून झालेला आहे. या पुस्तकाच्या लक्षात घेण्यासाखा खरा महत्वाचा भाग तिसऱ्या प्रकरणापासून सुरूवात होतो.

तिसऱ्या प्रकरणात राजाची कर्तव्ये त्याचे गुण विशेष त्याच्यावरील जबाबदारी त्याने करायचे धर्मरक्षण, साधावयाचा लोकसंग्रह त्याचा खजिना, त्याचे सैन्य इत्यादींबद्दल फार महत्वाची माहीती दिलेली आहे. सकल कार्यामध्ये अपकिर्तीचे भय बहुत वागवावे, धर्मास विरूध्द अशी पाखंड मते राज्यात सर्वोपरि होऊ देऊ नये, राजे लोकांनी निदान युध्दाव्यतिरीक्त स्वशरीर स्वरक्षणाविषयी सर्व काळ सावध असावे, उन्मत्त द्रव्य सर्वथैव भक्षू नये, जवळील लोकांस भक्षू देऊ नये, रोजलोकांस मुख्य कार्य साधी नियता कारभार आहे त्यास विक्षेप पडो न द्यावा, केवळ स्वस्थूतीप्रियता हाही दोष मोठाच आहे, राजेलोकांस विनोदाचे व्यसन एकंदर नसावे, खजिना म्हणजे राज्याचे जीवन आहे, ज्यांचे पदरी फुजरात (सैन्य) बळकट नाही, ते सत्ता पराधीन, वरकड नित्यकार्य साधारण सेवकास सांगणे, ते प्रायशः इशारतीनेच सांगत जावे, इशारत म्हणून सर्व काळ नेत्र

हस्तपादादी अंगी विकार शरीर चांचल्या सर्वथा न दाखवावे. बसले ठायी स्थायु किंवा मेरू असा आसन जय बरा अभ्यासावा, माया धरून अभ्यासास अंतर करू नये, राजे लोक बहुत गुण असावे, राजे लोकी बहुत सोसक असावे लागते.

चौथ्या प्रकरणात प्रधानाचे, सरकारकुनाचे महत्व किती आहे, तो कसा निवडावा, त्याचे गुण व अवगुण कोणते त्यांच्याशी राजाने कसे वागावे, त्याचा मान कसा वाढवावा इत्यादीसंबंधीचे विवेचन आले आहे. प्रधान विरहित राज्यकारभार चालणेच नाही, प्रधान म्हणजे राज्यलक्षण ग्रहाचे स्तंभ आहेत, प्रधान म्हणजे नृपसत्ता प्रसारक, प्रधान म्हणजे प्रजापालन धर्मसंरक्षणाचे अध्यक्ष, प्रधान म्हणजे राजमदनजित (राज्याधिकारामुळे निर्माण होणारे अन्याय) अन्याय सागराची मर्यादा, प्रधान म्हणजे हस्तीचे अंकुश, किंबहुना प्रधान म्हणजे इहलोकी राज्यकृत्य संपादनामुळे नृपाची विश्रांत, धर्म प्रतिपालनामुळे परलोकपंथीची दिपीका, प्रधानापेक्षा राजेलोकास इतर आप्त व अधिकोत्तर नाही, सकल सेवकांपेक्षा प्रधानाचा बहुमान विशेष आहे, प्रधान हेच राजेलोकांची बाजू, प्रधान राजेबंधू असे राज्यलोकी पूर्ण चित्तात आणून लाक्षणीक प्रधान पाहून करावे, त्यावर संपूर्ण राज्यभर ठेवावा, प्रधान म्हणजे सरकारकून त्याची भीड सर्वांपेक्षा अधिकोत्तर वागवावी आपले शासनाप्रमाणेच त्याचे शासन सकळांवर चालवावे, सकल भिडेचा शिरोभाग तो सरकारकून, नृपदेवी उपरी सरकारकूनाची पदवी.

पाचव्या प्रकरणात सावकार व व्यापारी या संबंधीची राजाची दृष्टी कशी असावी, सावकारांना व व्यापाऱ्यांना आपल्या राज्यात स्थान कशा प्रकारचे द्यावे या विषयीची मार्मिक चर्चा आहे. साहुकार म्हणजे राजाची व राजश्रीची शोभा

सहाव्या प्रकरणात देशमुख, कुलकर्णी, पाटील इत्यादी वतनदार त्यांची प्रवृत्ती त्यांच्याशी राजाचे वर्तन यासंबंधीच्या सूचना येतात. राज्यातील वतनदार,देशमुख, देश कुलकर्णी, पाटील आदि करून यास वतनदार म्हणून म्हणावे ही प्राकृत परीकृत परिभाषा मात्र आहे ते स्वल्पच परंतु देश नायकच आहेत, हे लोक म्हणजे राजांचे दायादच (शत्रू) आहेत, यास स्नेह आणि दंड या दोहोमध्ये निक्षूण ठेवावे लागतात, आधी वतनदार हा एक विश्वास, तोपी प्रामाणिक म्हणजे सोने आणि सुगंध देखील बांधू न द्यावे, वतनदारास वाडे देखील बांधू न द्यावे.

सातव्या प्रकरणात वृत्तीवंतास म्हणजे वतनदारास द्रव्यादी साह्य द्यावे पण जमीन देऊ नये अशी आग्रहाची इशारे व सूचना केली गेलेली दिसते. नुतन (इनाम) वृत्ती करू देऊ नये. उदरनिर्वाहाचे साधन, वृत्तीवंतास पापाचे भयच नाही, धर्मार्थ भूमीदान देणे याचे पुण्यानंद आहे.

आठव्या प्रकरणात किल्ल्याचे महत्व वर्णन केले आहे व राज्यरक्षणाच्या दृष्टीने किल्याचा बंदोबस्त कसा ठेवावा याविषयीचे मार्गदर्शन आहे. संपूर्ण राज्याचे सार ते दूर्ग, गडकोट विरहित जे राज्य त्या राज्याची स्थिती म्हणजे अभ्रपटलन्यास आहे अर्थात आकाशात ज्याप्रमाणे ढग येतात व क्षणात नाहीसे होतात त्याप्रमाणे ज्या राज्यात किल्ले नाहीत ते राज्ये आकाशातील ढगाप्रमाणे केंव्हाही नष्ट होऊ शकते, गडकोट म्हणजे हे राज्याचे मुळ, गडकोट म्हणजे खजिना, गडकोट म्हणजे सैन्याचे बळ, गडकोट म्हणजे राजलक्ष्मी, गडकोट हेच राज्य, गडकोट म्हणजे आपली वस्तीस्थळे, गडकोट म्हणजे आपले सुखनिद्रागार, किंबहुना गडकोट म्हणजे प्राणसंरक्षण, मुख्य किल्लेदार कसा असावा या विषयी मराठे आणि शिपाई जे शरम धरीत असतील, कबीलेदार म्हणजे कुटूंबवत्सल, विश्वासू, उद्योगी, अलालुची, अनिद्रीष्ट सकल लोकांचे समाधान स्वामी कार्य घेत असे ठेवावेत, किल्ल्याची सेवा परमकठिण शासन पर उद्र शासन न करीता किल्याचे काम सर्वसाधारण होऊन जातात असे सर्वथैव न करावे शरीर संबंधी आप्तविषयी अथवा त्यांचे निष्पत्तीचे लोक अंतर पडलिया शासन करीत आपणास संकोच अशा लोकास किल्ल्याचे मामले सर्वथैव न सांगावेत, किल्ल्याजवळील लोक किल्ल्यावर न ठेवावेत, किल्ल्यास एक दरवाजा आयब (दोष) आहे, गडास यायचे मार्ग असतील ते सुगम नसावेत, गडावर आधि उदक (पाणी) पाहून किल्ला बांधावा. गडावरील राजमंदिराविरहीत थोर इमारतीचे घर बांधू नयेत, दारूखाना घराजवळ घराचे परीगाखाली नसावा, गडावरील झाडे असतील ती राखावे.

नवव्या प्रकरणात आरमाराचे वर्णन करून कांही महत्वाच्या सूचना दिल्या आहेत. ज्या जवळ आरमार त्याचा समुद्र, कोळी सावकाराच्या वाटेस जाऊ नयेत, आपल्या राज्यात सागवान आदी वृक्ष आहेत. त्याचे जे अनुकूल पडेल ते हुजरचे परवानगीने तोडून न्यावे व विरहित जे लागेल ते परमुलखी जाऊन खरेदी करून आणखीन जावे. या वृक्षांच्या अभावने हानी होते याकरिता हे गोष्टी सर्वथैव होऊन द्यावी.

अशा प्रकारे तीन ते नऊ या प्रकरणातून शिवाजीचा राजकारण विषय दृष्टीकोन राज्यकारभार विषयक त्याची वागण्याची पध्दत यातून शिवकालीन राजनीतीवर येथे प्रकाश टाकला गेला आहे आणि म्हणून आज्ञापत्राचे केवळ तीन ते नऊ ही सहाच प्रकरणे तेवढी महत्वाची ठरतात.

निष्कर्ष :-

1) मुसलमानांच्या सहवासानंतर त्यांच्या तवारीखा पाहून मराठयांनी बखरी लिहिण्याचा प्रकार निवडला.
2) बखर हा शब्द हकिकत, बातमी, इतिहास, चरित्र, कथानक या अर्थाने वापरला जातो.
3) साहित्याच्या दृष्टीने बखरींना महत्व आहे.
4) आज्ञापत्राचा हा विषय राजनिती विषयीचे दिशादर्शन करणे हा विषय आहे.
5) आज्ञापत्रातील शेवटची पाच प्रकरणे महत्वाची आहेत.
6) आज्ञापत्र ग्रंथावर कोणत्याही संस्कृतग्रंथाचा प्रभाव नाही.
7) आज्ञापवत्रात बखरीचे कांही विशेष आढळतात.
8) आज्ञापत्र हा शास्त्रीय स्वरूपाचा ग्रंथ आहे.

संदर्भग्रंथ :-

1) (संपा.) प्र.न.जोशी, 'आज्ञापत्र', व्हीनस प्रकाशन पुणे, तिसरी परिवर्धित आवृत्ती, 1980
2) अ.ना. देशपांडे, 'प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास', (भाग सातवा), व्हीनस प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती, 1988
3) र.वि.हेरवाडकर, 'मराठी बखर', व्हीनस प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती, 1975
4) ह.श्री. शेणोलीकर, 'प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरूप', व्हीनस प्रकाशन, पुणे, सहावी आवृत्ती, 1987.
5) ल.रा.नसिराबादकर, 'प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास', फडके प्रकाशन, कोल्हापूर.

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com